आगीचा डोंगर


लेखक: थॉमस लुईस

चित्रे: जोन सँडिन



आगीचा डोंगर

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





कोणे एके काळी मेक्सिकोत एक शेतकरी राहात होता.

तो एका छोट्याशा गावातील एक घरात राहात असे.

त्याच्या घरात केवळ एकच खोली होती.




तो शेतकरी आनंदी नव्हता.

“इथे काहीच घडत नाही,”

अशी त्याची तक्रार होती.

गावकरी शेतकऱ्याला मूर्ख म्हणत.

“आपल्याकडे गरजेपुरतं सगळं काही आहे,” गावकरी म्हणत.




“गावात एक शाळा आहे,

बाजार आहे,

आणि एक जुनं चर्चसुद्धा आहे. दर रविवारी तिथे घंटानाद होतो. आपलं गाव सर्वात चांगलं आहे.”

“पण इथे काहीच घडत नाही,”

शेतकरी पुन्हा तेच बोलू लागला.



रोज सकाळी जाग आल्यावर शेतकऱ्याला सर्वात आधी आपल्या घराचे छत दिसत असे.

रोज सकाळी न्याहरीला तो मक्याच्या दोन भाकऱ्या खात असे.

या भाकऱ्या त्याची पत्नी रात्रीच बनवून ठेवत असे.

तो भाकरीवर मध लावत असे आणि मातीच्या भांड्यातून दालचिनी चहा पीत असे.

“इथे काहीच घडत नाही,” तो एकच पाढा रटत असे.




एके दिवशी काळोख होता. पण शेतकरी शेतात जाण्यासाठी तयार झाला.

त्याचा मुलगा *पाब्लो* अजून झोपलेलाच होता.

“कदाचित आज काहीतरी घडेल,” त्याची पत्नी म्हणाली.

“नाही. इथे काहीच घडत नाही,” शेतकरी पुन्हा म्हणाला.

शेतकरी बैल घेऊन शेतात गेला, अजिबात मागे वळून न बघता.




रात्री शेतकरी घरी परतला. त्याने बैलाला खाऊपिऊ घातले.

मग तो शेकोटीजवळ बसला. पाब्लो पाच गुळगुळीत दगडांशी खेळत होता.

त्याने दगड भोकांच्या दिशेने फेकले. ही भोके त्यानेच खोदली होती जमिनीवर.

“बघा बाबा!” पाब्लो ओरडला.

“माझा एक दगड
बरोब्बर
भोकात
गेला!"



पण शेतकरी थकला होता. त्याने काहीच उत्तर दिले नाही. दर दिवशी हेच घडत होते.

एकदा सकाळी शेतकरी खूप लवकर उठला. त्याने आपला लोकरीचा शर्ट घातला.

त्याने भिंतीवरील खुंटीला लावलेली आपली मोठी टोपी उतरवली.

“आज मला शेतावर लवकर जायला हवं,” तो म्हणाला.

“अजून शेताची नांगरणी झालेली नाही. मक्याची लागवड करायची वेळ नजिक आलीय.”



शेतकऱ्याने सकाळी आपल्या शेतात काम केले. बैलाने त्याला मदत केली.


नांगरणी करताना शेतात एक मोठा खडक मध्ये आला, तेव्हा बैल थांबला आणि खाली बसला.

शेतकऱ्याने खडक दूर ढकलला.

“चल! चल!” शेतकरी म्हणाला.

बैलाने शेतकऱ्याकडे पाहिले.

मग बैल उठला आणि नेहमीसारखा नांगर ओढू लागला.



दुपारी कडक ऊन असताना
पाब्लो शेतावर आला.



“पाब्लो!” शेतकरी म्हणाला. “आज शाळेत का गेला नाहीस?”

“आजा सुट्टी आहे, बाबा,” पाब्लो म्हणाला.


“मी नांगर चालवण्यात तुम्हाला मदत करायला आलोय,” पाब्लो म्हणाला. शेतकऱ्याने स्मित केले.

शेतकऱ्याने आपल्या खिशातील एक छोटेसे लाकडी खेळणे पाब्लोला दिले.

“लाकडाचा बैल!” पाब्लो ओरडला. शेतकऱ्याने दुपारच्या विश्रांतीच्या वेळात आपल्या मुलासाठी ते खेळणे बनवले होते.



पाब्लोने नांगरणी करण्यात शेतकऱ्याला मदत केली.



बैलाने नांगर ओढला आणि नांगराने खालची माती वर उचलली. पण अचानक नांगर थांबला.

शेतकरी आणि त्याच्या मुलाने धक्का दिला, बैल नांगर ओढू लागला पण नांगर हलला नाही. तो मातीत खोल खोल जाऊ लागला.

खोल!

खोल!

एका

छोट्याशा

भोकात.

हळूहळू छोटे भोक मोठे होत गेले.

खालून गोंगाट ऐकू आला.

जमिनीखालून खोलवरून कुणाच्यातरी
गुरगुरण्याचा आवाज येऊ लागला.

शेतकऱ्याने पाहिले.

पाब्लोने पाहिले.

बैलाने मान वळवली.

जमिनीच्या भोकातून पांढरा धूर
बाहेर निघत होता.



“पळ!” शेतकरी ओरडला.


“पळ!”

मग मोठ्ठा आवाज होऊन जमिनीला भेग पडली.

आणि पृथ्वी जणू खुली झाली. शेतकरी पळाला.

पाब्लो पळाला. बैलसुद्धा पळाला.

जमिनीतून आग आणि धूर निघू लागले.



शेतकरी आपल्या गावाकडे पळाला.


तो चर्चमध्ये शिरला आणि जोरजोराने घंटा वाजवू लागला.



इतर शेतकरी आपली शेते सोडून पळत पळत आले.

लोक आपापल्या घरातून बाहेर आले.

“बघा!” शेतकरी म्हणाला. “तिथे बघा!”



त्या रात्री कुणीही झोपले नाही.

प्रत्येकाने आभाळात आग बघितली.




जिथे शेतकऱ्याचे शेत होते

तिथून आग निघत होती.



मग एक मोठ्ठा स्फोट झाला,
मग आणखी एक, आणखी
एक....



जमिनीतून तप्त लाव्हारस बाहेर निघू लागला.

लाव्हारस झाडाझुडपांतून मार्ग काढत जमिनीवर पसरला.


लाव्हारस गावाच्या दिशेने वाहू लागला.

लाव्हारस शेतकऱ्याच्या घराच्या दिशेने वाहू लागला.

जळत्या दगडांचे तुकडे हवेत

उडू लागले.

आता धरती खोकू लागली. प्रत्येक वेळी खोकताना आगीचा डोंगर आभाळात उसळू लागला, वाढू लागला.



काही दिवसांतच, तो डोंगर एका उंच पर्वताएवढा मोठा झाला.

आणि तिथे दर काही मिनिटांनी एक मोठा स्फोट होऊ लागला.

खारी, ससे आगीपासून दूर पळू लागले. पक्षी आगीपासून दूर उडून जाऊ लागले.

लोकांनी आपली गाढवं आणि बैल सुरक्षित जागी नेली.


जळणारा निखारा सर्वत्र उडू लागला. शेतकरी आणि त्याच्या शेजाऱ्यांनी धुरापासून बचाव होण्यासाठी आपल्या नाकावर ओला कपडा बांधला.



काही लोक वाफाळत्या लाव्ह्याजवळ गेले. त्यांनी आपल्यासोबत क्रॉस नेला.



आग थांबावी म्हणून त्यांनी प्रार्थना केली. शेतकरी आणि पाब्लो एका डोंगराच्या बाजुने ते दृश्य पाहू लागले.




स्फोट बंद झाल्यावर आग कमी झाली. पण तोवर शेतकऱ्याचे घर नष्ट झाले होते.

शाळासुद्धा जळून खाक झाली होती. बाजार नाहीसा झाला होता. निम्मे गाव उध्वस्त झाले होते.



नंतर एके दिवशी काही गणवेशधारी सैनिक कार आणि ट्रकमधून त्यांच्या गावात आले.



“अच्छा तर तुम्हीच तुमच्या नांगराने पृथ्वीला भेग पाडलीत तर,” ते शेतकऱ्याला म्हणाले.

मग ते हसू लागले.


“नशीब तू जिवंत आहेस अजून.”




सैनिकांनी गावाकडे पाहिले. “सर्वांना हे गाव सोडून जावं लागेल!” कप्तान म्हणाला.

“आता इथे राहाणं सुरक्षित नाही.”

मग शेतकरी, त्याची पत्नी, पाब्लो आणि सर्व गावकरी सैनिकांसोबत गेले. ते ट्रकमध्ये बसून निघून गेले.





शेतकऱ्याला नवे घर मिळाले.

हे घर जुन्या घरापेक्षा मोठे होते.

जुने घर नव्या जागेपासून फार दूर नव्हते. पण त्या राक्षसी ज्वालामुखीपासून सुरक्षित राहाण्याइतपत ते दूर होते.

लोकांनी त्या भयानक ज्वालामुखीला *राक्षस* असे नाव दिले होते.

लोकांनी तिथे नवे गाव वसवले.


त्यांनी नवी शाळा आणि नवा बाजार वसवला.



लोकांनी मोठा उत्सव केला, कारण आता ते सुरक्षित होते. जत्रेत बँड वाजले. लोक आनंदाने नाचले. त्यांनी टाळ्या वाजवल्या.







शहरातील लोक बसमधून राक्षस ज्वालामुखी पाहायला येऊ लागले.


त्यांची भूक भागवायला गावकरी संत्री, खरबूज, बर्गर, मक्याची रोटी विकू लागले.

आता शेतकऱ्याकडे नवे शेत होते. तो दररोज सकाळी लवकर उठू लागला. त्यावेळी काळोख असतो आणि आभाळात राक्षस ज्वालामुखी चमकत असतो.

रोज सकाळी न्याहरीमध्ये शेतकरी दोन मक्याच्या रोट्या खातो.

त्याची पत्नी या रोट्या रात्रीच बनवून ठेवते.


शेतकरी आपल्या नव्या शेतात जातो. त्याचा बैलसुद्धा पूर्वीसारखाच त्याच्यासोबत जातो.




कधीकधी पाब्लो गावातील मुलांसोबत शेतकऱ्याला भेटायला येत असतो.

ते सगळे शेतातून धुमसता ज्वालामुखी पाहातात. मुलांना तो चिरूट ओढणाऱ्या एखाद्या म्हाताऱ्यासारखा भासतो.

मुले शेतकऱ्याला विचारतात, “तुम्ही आणखी एक आगीचा डोंगर बनवू शकता का?”





“नाही दोस्तांनो,” शेतकरी हसत हसत म्हणतो.

“मला आगीचा हा एकच डोंगर पुरेसा आहे.”

लेखकाचे मनोगत

ही गोष्ट 20 फेब्रुवारी 1943 रोजी उद्रेक झालेल्या *पॅरीक्युटीन* ज्वालामुखीच्या अहवालावर आधारित आहे. या ज्वालामुखीचा उद्रेक मेक्सिकन राज्य मिचोओकानमधील *डायोनिसिओ पुलिडो* नावाच्या एका *टारास्कान* इंडियन समुहातील एका शेतकऱ्याच्या मक्याच्या शेतात झाला होता.

त्या भयानक आपत्तीत कुणाचाही मृत्यू झाला नव्हता. पण दोन हजारपेक्षा जास्त लोकांनी आपले घरादार गमावले होते.

यापूर्वी मानवाच्या डोळ्यांदेखत केवळ एकाच ज्वालामुखीचा उद्रेक झाल्याची नोंद होती. तो ज्वालामुखी कॅनरी द्विपसमुहातील *टेनेरिफ* बेटावर फुटला होता.

लोक पॅराक्युटीनला भेट देऊ शकतात. तिथे त्यांना ज्वालामुखी आणि कठीण झालेल्या राखेत खोलवर गेलेली, उध्वस्त झालेली गावे दिसू शकतील.

पाब्लोच्या वडिलांचा प्रत्येक दिवस अगदी सारखा असे. मग एके दुपारी जमीन गुरगुरू लागली आणि त्यातून धूर बाहेर निघू लागला. त्यांचा नांगर जमिनीत गुडूप झाला. त्यांच्या मक्याच्या शेतात एका ज्वालामुखीचा उद्रेक होऊ लागला!